# समूह संसाधन व्यक्ती - मार्गदर्शिका



उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोंन्नती अभियान, महाराष्ट्र

१. प्रस्तावना ........ 3

२. समूह संसाधन व्यक्तींचे प्रकार ........ 3

३. संसाधन व्यक्ती, कार्यक्षेत्र, निवड समिती, उत्तरदायीत्व ........ 4

४. निवड खर्च, मानधन, भत्ते, प्रवास खर्च आणि लेखाशीर्ष ........ 5

५. समूह संसाधन व्यक्तींना द्यावयाचे साहित्य (कीट) आणि खर्च ........ 6

६. समूह साधन व्यक्तींसाठी काही सुविधा आणि सूचना ........ 6

७. गटाची हिशोबनीस (SHG Book keeper) ........ 7

८. सक्रीय महिला (Active Woman) ........ 7

९. प्रेरिका (Community Facilitator) ........ 9

१०. स्वच्छता सखी (WASH CRP) ........ 13

११. आहार सखी (Nutrition CRP) ........ 16

१२. अभया (Gender CRP) ........ 19

१३. ग्रामसंघ लिपिका (Vo Accountant) ........ 22

१४. सूक्ष्म नियोजन संसाधन व्यक्ती (MIP CRP) ........ 24

१५. समुदायस्तरीय प्रशिक्षक (Community training consultant) ........ 27

१६. प्रति गट (Cluster) कमाल २ समुदायस्तरीय प्रशिक्षक निवडावे. ........ 27

१७. वर्धिनी (External CRP) ........ 34

## प्रस्तावना

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोंनती अभियानावर आधारित महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोंन्नती अभियानाची अंमलबजावणी "उमेद" नावाने सुरु आहे. ३३ जिल्ह्यांमध्ये व्यापक पद्धतीने कामाचे नियोजन करण्यासाठी सघन (intensive) आणि अघन (non-intensive) पद्धतीने अभियान राबविण्यात येत आहे. सघन पद्धतीने ३६ तालुके तर अघन पद्धतीने ३१५ तालुक्यात काम सुरु आहे. ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांपर्यंत पोहोचून दारिद्रय निर्मुलनासाठी गावपातळीवर ग्रामसंघ (Village Organization) तर गट (Cluster) पातळीवर गट संघ (Cluster Level Federation) उभारणे अपेक्षित आहे. ह्या ग्रामासंघांनी गावातील गरीब कुटुंबांना त्यांच्या उपजीविका आणि विकासाच्या विविध संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ग्रामसंघ हा स्वयंसहाय्यता गटातून निवडून दिलेल्या महिला प्रतिनिधींनी तयार केलेला गाव पातळीवरील गटांचे काम पाहणारा संघ आहे तर गट संघ (Cluster Level Federation) हा ग्रामसंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या प्रतिनिधीतून तयार झालेला संघ असेल.

हे काम शाश्वत होण्यासाठी गावातील महिलांनी पुढाकार घेऊन त्यातून कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण होणे अपेक्षित आहे. अशा या कार्यकर्त्यांना समुदाय संसाधन व्यक्ती संबोधण्यात येईल. उमेद अंतर्गत समुदाय संसाधन व्यक्तींचे प्रकार खालील प्रमाणे आहेत.

## समूह संसाधन व्यक्तींचे प्रकार

1. स्वयंसहाय्यता गटाची हिशोबनीस
2. सक्रीय महिला (Active Woman)
3. प्रेरिका (Community Facilitator)
4. स्वच्छता सखी (WASH CRP)
5. आहार सखी (Nutrition CRP)
6. अभया (Gender CRP)
7. ग्रामसंघ लिपिका (VOA)
8. सूक्ष्म नियोजन संसाधन व्यक्ती (MIP CRP)
9. समुदायस्तरीय प्रशिक्षक (Community training consultant)
10. बँक सखी (Bank Sakhi)
11. वर्धिनी (eCRP)

## संसाधन व्यक्ती, कार्यक्षेत्र, निवड समिती, उत्तरदायीत्व

| अनु. क्र. | संसाधन व्यक्ती प्रकार | कार्यक्षेत्र | निवड कोण करणार? (निवड समिती) | कुणाला जबाबदार (उत्तरदायित्व) | कोणत्या जिल्हयात कार्यरत |
|---|---|---|---|---|---|
| १ | हिशोबनीस | गट | गट | स्वयंसहाय्यता गट | सर्व दहा जिल्हे |
| २ | सक्रीय महिला (Active Women) | गाव | गावातील अस्तित्वात असलेले / NRLM फोल्ड मध्ये आलेले गट | निवड झाल्यापासून सुरवातीचे ६ महिने तालुका अभियान कक्ष. | सर्व दहा जिल्हे |
| ३ | प्रेरिका (Community Facilitator) | गाव | गाव प्रवेशादरम्यान उमेदचा CFT चमू आणि गावातील महिला | निवड झाल्यापासून सुरवातीचे ३ ते ६ महिने तालुका अभियान कक्ष. ग्रामसंघ स्थापन झाल्यापासून ६ महिन्यानंतर ग्रामसंघाकडे | सर्व दहा जिल्हे |
| ४ | स्वच्छता सखी | गाव | ग्रामसंघा मार्फत. पण जर एकापेक्षा अधिक पात्र आणि इच्छुक असल्यास ग्रामसंघ आणि तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष यांची समिती | ग्रामसंघ | *जालना, यवतमाळ, वर्धा, ठाणे, सोलापूर |
| ५ | आहार सखी (Nutrition Sakhi) | गाव | | | नंदुरबार, जालना |
| ६ | अभया (Gender CRP) | गाव | | | उस्मानाबाद |
| ७ | ग्रामसंघ लिपिका (VOA) | गाव | | | सर्व दहा जिल्हे |
| ८ | सूक्ष्म नियोजन संसाधन व्यक्ती (MIP CRP) | गट | ग्रामसंघ आणि तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष यांची समिती | गट पातळीवरील संघ अस्तित्वात येईपर्यंत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष | सर्व दहा जिल्हे |
| ९ | समुदायस्तरीय प्रशिक्षक (Community training consultant) | गट | | | सर्व दहा जिल्हे |
| १० | बँक सखी | गट | | | **सर्व रिसोर्स ब्लॉक्स |
| ११ | वर्धिनी (eCRP) | (आंतर) जिल्हा | | वर्धिनी संसाधन केंद्र | सर्व दहा जिल्हे |

* जालना, भोकारधन, घाटंजी, कळंब, मोहोळ, शहापूर, भिवंडी, देवळी, सेलू, वर्धा

** रिसोर्स ब्लॉक्स - जालना, भोकारधन, अक्कलकुवा, धडगाव, कळंब, घाटंजी, अहेरी, एटापल्ली